
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. ४०५८



कुमार साहित्य—१

मराठी ग्रंथ संग्रहालय
वाचनालय

# ललकार

वा क्र. २०५८.

लेखक

कु. चंद्रकांत शेट्ये

कु. दिनकर देशपांडे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २०५८

कुमार साहित्य प्रकाशन, कोल्हापूर.

किंमत पांच आणे

प्रकाशक
चंद्रकांत शेट्ये
कुमार साहित्य प्रकाशन
७२८ रविवार, कोल्हापूर

●

प्रकाशन १ ले

●

सर्व हक्क
सुरक्षित

●

मुखपृष्ठ
चित्रकार श्री. बडे

●

मुद्रक
गो. य. गुणे
चिंतामणि मुद्रणालय
मंगळवार, कोल्हापूर.

# प्रास्ताविक

मराठी वाङ्मयांत कुमार वाङ्मयाचा किंवा बालवाङ्मयाचा स्वतंत्रपणें परामर्श घ्यावा, इतकें त्याचें दालन मोठें आहे. पण आजवर जें कुमार साहित्य प्रसिद्ध झालें, तें एका ठराविक मर्यादे-पर्यंतच्या कुमारांना उपयुक्त असें होतें. साधारणपणें अकरा ते वीस वर्षांपर्यंतच्या कुमारांना नव्या-ध्येयाचीं, नवे मार्गदर्शविणारीं पुस्तकें वाचावयास मिळालीं, तर हवीं असतात. आज आपल्याला दहा वर्षांखालील किंवा अठरा वर्षांवरील व्यक्तींनीं वाचावींत अशींच पुस्तकें पाहावयास मिळतात. नवे संस्कार करून आयुष्याची घडण जेव्हां केली जाते, त्यावेळेस उपयुक्त अशीं पुस्तकें आज मराठी साहित्यांत फारशीं नाहींत. तसा प्रयत्न केला जाणें आवश्यक आहे. ' कुमार-साहित्य-माला ' त्या दृष्टीनें मार्गक्रमण करूं इच्छिते. त्या दृष्टीनं पहिलं पाऊल आज आम्ही टाकीत आहोंत. आमच्या उद्देशानुसार पुढील प्रकाशनें तयार करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

ही स्वतंत्र प्रकाशन संस्था कुमारांची आहे. अमेरिकेंत अशा कुमारांच्या खूप संस्था आहेत.

तेथील कुमार वृत्तपत्रेंहि चालवतात. आम्ही सुद्धां तें करूं शकूं. पण आमच्या उत्साहाला सरकारची आणि समाजाची जोड मिळाली पाहिजे. आमचें आजवरचें आणि यानंतरचें कार्य भारतीय कुमार स्वयंस्फूर्त कार्य करूं शकतात, हें दर्शवूं शकेल असा आमचा विश्वास आहे.

'कुमार साहित्य-माला' चिरंजीवी करण्यासाठीं सर्वांनीं सक्रिय सहकार्य करावं अशी आग्रहाची विनंति आहे.

हें पुस्तक प्रसिद्ध करीत असतांना वेळोवेळीं सूचना करून व इतर तऱ्हेनें सहाय्य करणारे गुरुवर्य कृ. व कुलकर्णी, श्री. शंकरराव बुळे, श्री. वसंत स. जोशी, श्री. गो. य. गुणे यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत.

१५ ऑगस्ट १९५२ — प्रकाशक

मराठी ग्रंथ संग्रहालय
61.41


# जंबू, प्रधान आणि राज

'कु–कूऽकूऽऽऽकु' राज कोंबडा आरवला. सूर्याची कोंवळी किरणें वसुंधरेला न्हाऊं घालीत होती.

'कु–कूऽकूऽऽऽकु' राजनं जेव्हां दुसऱ्यांदा साद घातली तेव्हां आसपासचे त्याचे जातभाई खडबडून जागे झाले, अन् क्षणार्धांत वातावरण 'कुकूऽकू' नें दुमदुमलें.

राखेच्या ढिगाऱ्यावर उभा राहून राज आजुबाजूस दृष्टिक्षेप टाकीत होता. सूर्याच्या कोंवळ्या किरणामुळें त्याचा पिसारा तकाकत होता. अन् तुरा तर अगदीं माणकासारखा शोभत होता!

थोड्याच वेळांत सारीं कुक्कुटप्रजा त्याच्याभोंवती गोळा झाली. प्रत्येकजण मोठ्या आदरानं त्याच्याकडं पहात होता.

'प्रधानजी, नवल विशेष?' राजनं पृच्छा केली.

'सर्व कांहीं ठीक आहे, महाराज!' प्रधान कोंबडा उत्तरला. पण त्याचे हे बोल खोटे ठरायचे होते कीं काय कोण जाणे! एक कोंबडी लगबगीनं पुढं झाली, अन् खिन्न स्वरांत म्हणाली, 'महाराज, काल सर्वांदेखत जम्बूनं माझा

---

चंद्रकांत शेट्ये

थोरला पोर पळविला. प्रधानजींना हें माहित असून...' पुढें तिच्यानें बोलवेना.

'प्रधानजी! काय हा अन्याय! माझा तोंडपुजेपणा करून काय मिळवायचंय् तुम्हांला?... बोला... असें गप्प कां?' राज चिडून बोलला.

प्रधानजी क्षणमात्र बावरले. त्यांनीं एकवार सभोंवतीं दृष्टी फिरविली. अन् खालीं मान घालून भीति-युक्त आवाजांत ते बोलले, 'महाराज, विस्मरणामुळं घडलं हें!...'

अन् लवकरच दरबार बरखास्त झाला. सर्व प्रजाजन आपापल्या स्थळीं निघून गेले. मात्र राज जागच्या जागीं उभा होता. त्याच्या मनांत विचारांचं काहूर माजलं होतं. जंबूची राक्षसी आकृति त्याच्या डोळ्यापुढं थैमान घालीत होती—

जंबू!... खरंच, जंबू बोका फार फार दुष्ट होता. साऱ्या कुक्कुट प्रजाजनांना तर तो कर्दनकाळ वाटे. गेले कित्येक दिवस तो कुक्कुट–प्रजाजनांना फार छळीत होता. त्यांच्यातील रोज एकाचा तो फडशा पाडी. अन् म्हणूनच राजला त्याचा बंदोबस्त करावासा वाटे. त्याला ठार मारावेसें वाटे.

खिन्न मनःस्थितींत राज उभा होता. तोंच परिचित आवाज त्याच्या कानांवर आदळला—

'कांव...कावऽ..राजूदादा, ठीक आहे ना?' शेजारच्या झाडावर बसलेला भगू कावळा मान वांकडी करून विचारतां झाला.

'ठीक आहे, पण...' राज अडखळला.

'अरे, बोल ना, असा अडखळतोस का?' भगू कावळा आतुरतेनं म्हणाला. त्याला वाटलं, नक्कीच आपल्याला कांहीं विशेष ऐकायला मिळणार! अन् खरंही होतं ते!

'तो जंबू तुला माहित आहे ना?' राज म्हणाला.

'जम्बू बोका?'

'हां, तोंच! अलीकडं त्यानं फार त्रास द्यायला सुरवात केलीय् आम्हांला—काल आमच्यांतल्या एकाला मारलं त्यानं–'

'अस्सं काय! एकूण त्याची साडेसाती तुमच्याहि मागून सुटत नाहीं तर!'

'म्हणजे?'

'अरे, तुमच्याप्रमाणं मलाही पिडायचं धोरण ठेवलंय् त्यानं. माझा तो चौकु आहे ना...नंदूच्या वाड्याचा...तिथं रोज दिवसा वास्तव्य ठोकलंय् त्यानं...जागचा हालत नाही

तिथून....अन् म्हणूनच आतांशा चौकांत वाळत घातलेला एकही जिन्नस लागत नाहीं तोंडाला-- '

पुढं भगू खूप सांगणार होता. पण राजला तें ऐकायचं नव्हतं--नव्हे, त्याचं लक्षच नव्हतं तिकडं ! --- ' कु - कूऽकूऽऽऽकु ' त्यानं साद दिली. अन् भगूचा निरोप घेऊन तो चालता झाला.

भगू हिरमुसला. राजसारख्या आपल्या जिवलग मित्रानं आपलं बोलणं पुरतं ऐकून घेऊ नये, म्हणजे काय ? अस्वस्थ मनःस्थितींत तो सभोंवार पाहूं लागला, तोंच आपल्या रोखानं येत असलेल्या प्रधान कोंबड्याकडं त्याचं लक्ष गेलं. तो आश्चर्यचकित होऊन उद्गारला--

' ओ-हो, प्रधानजी ! इकडं कुठं ? '

' आलो तुझीच भेट घ्यायला. '

' माझी ? अन् भेट ? वा ! भेट घ्यायला मी कोणी बादशहा नव्हे....'

' हें पहा, भगू ! ' भगूच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून प्रधानजी म्हणाले, ' माझ्यावर सारे कुक्कुट प्रजाजन फार फार चिडलेत--कोणीही सरळ बोलत नाहीं माझ्याशीं--'

' बरं मग मी काय करूं म्हणतोस ?" भगूनें चेष्टेच्या स्वरांत विचारलें.

‘ सारेजण माझ्यावर खूष होतील असा एखादा उपाय सांग कीं तूं मला. सांगशील ?’

‘ हो, सांगीन कीं ! माझं रे काय !—’ भगू क्षणभर घुटमळला. अन् कांहींसा विचार करून तो म्हणाला, ‘ हें बघ, तूं जर जम्बूचं पारिपत्य करशील तर सारे कुक्कुट प्रजाजन खूष होतील तुझ्यावर–अगदीं बेहद्द खूष ! ’

‘ हो, पण तें जमणार रे कसं ?’ प्रधानानें शंका प्रकट केली.

‘ कां ? न जमायला काय झालं ?’

‘ म्हणजे ? ’ प्रधान जास्तच गोंधळला.

‘ हें बघ, तुला डोकं आहे ना ? ’ भगूनं हंसत हंसत विचारलं.

‘ आहे. ’ प्रधान उत्तरला.

‘ म्हणून तर राजूनं तुला प्रधान नेमलेय, होय ना?’

‘ होय ’

‘ मग त्या डोक्याचा उपयोग... ’

‘ मी अवश्य करीन...’

आणि मग भगूचे आभार मानून प्रधान कोंबडा निघून गेला.

चंद्रकांत शेट्ये

एक दिवस गेला.

दुसरा दिवस सरला.

अन् तिसरा दिवस उजाडला—

दुपारची वेळ. ऊन मी म्हणत होतं. अन् अशा वेळीं जम्बू, गोखल्यांच्या विहिरीवर बसला होता. डोळे मिटून, पाय पोटाशीं लपेटून बसला होता. जणुं ध्यानस्थ मुनीच ! उन्हाचा त्याला काय त्रास ? कारण तो जिथं बसला होता, तिथं शेजारच्या झाडाची सावली पडली होती.

भगूच्या भेटीपासून प्रधान कोंबड्याच्या डोक्यांत सूडाचे वेड शिरलें होतें. आतांशा तो सदैव जंबूच्या पाळतीवर असे. अन् आज ? आज तर त्याला चांगलीच संधी मिळाली होती...जम्बू ! विहिरीच्या कांठावर डोळे मिटून पडलेला जम्बू ! बस्स !...हें एकच दृश्य दिसत होतें त्याला...

मनाशी कायसं ठरवून, पंख उभारून मोठ्या त्वेषानं प्रधान कोंबडा जम्बूवर धावला. एक क्षण-हो, फक्त एकच क्षण- प्रधान कोंबड्याच्या विलक्षण धडकीनं जम्बू विहिरींत कोसळला...अन् तोल न सावरतां आल्यानं प्रधानाचीही तीच गत झाली.

अन् काय योगायोग ! त्याच वेळीं तहानलेला भगू विहिरीवर अवतीर्ण झाला. जें दिसलं तें त्वरित राजच्या कानावर घालावसं वाटलं त्याला...

चंद्रकांत शेट्ये

--'काव् काव्' करीत भगू उडाला. राजला शोधूं लागला. अखेर राज त्याला भेटला. त्यानं राजला सांगितलं..

—जे पाहिलं होतं ते सांगितलं—

-- साद घालून राजनं साऱ्या कुक्कुटप्रजाजनांना जमविलं. अन् क्षणाचाही विलंब न करतां सर्वांनिशीं तो विहिरीपाशीं आला. त्यानं विहिरींत वाकून पाहिलं--

—बिचारा प्रधान कोंबडा केविलवाण्या स्वरांत ओरडत होता ! अन् त्याच्या बरोबरीनंच जंबू गटंगळया खात होता.

राजला कससंच झालं. त्याला वाटलं, आपण ओरडावं-लोकांना जमवावं—ते खचित वर काढतील प्रधानजींना ! पण दुसऱ्याच क्षणीं त्याच्या मनीं विचार आला—प्रधानजींना काढतेवेळीं त्यांनीं जंबूलाही बाहेर काढलं तर—तर मग पुन्हां सत्र चालूं होईल-खुनाचं-द्वेषाचं-सूडाचं ! ! !

ग्रंथ संग्रहालय

२०-६-५२ —साहित्य-साज

# अपमानाचा बदला

एकदां काय झालं ! पशूंचा राजा सिंह मरण पावला. फार दिवस आजारी होता तो. हां हां म्हणतां ही बातमी सर्व पशूंना कळली. बिचारी सिंहिण फार दुःखी झाली.

दुसरे दिवशीं दुःखवट्याची सभा भरली. सभेला हत्ती हजर होते. वाघ हजर होते. लांडगे हजर होते. माकडें हजर होतीं. सारे सारे पशुगण हजर होते. पण झालं काय— दुःख व्यक्त करायचं राहिलं बाजूला, अन् ' राजा कोणी व्हावें, हाच वाद उत्पन्न झाला ! आणि मग एकच गोंधळ उडाला.

शेवटीं निकाल झाला. लांडगोबांची स्वारीच राजा होण्यास लायक ठरली. पण हुशार कोल्ह्याला ही गोष्ट आवडली नाहीं. कारण एके प्रसंगीं लांडग्यानें त्याचा भयंकर अपमान केला होता. मनांतल्या मनांत जळफळत कोल्हा लांडग्यास म्हणाला, " महाराज, आपण अगोदर राणीसाहेबांचीं परवानगी घ्यावी. अन् मगच राजपद स्वीकारावें, नाहीतर त्या रागावतील ! "

---

चं द्र कां त शे ट्ये

कोल्ह्याची ही सूचना सर्व पशूंना फार आवडली. लांडग्यानेंहि दुसरे दिवशीं सकाळीं सर्व पशूंसह राणीसाहेबांना सिंहीणीला-भेटावयास जावयाचें कबूल केलें. सभा संपली. सर्वजण आपापल्या घरीं निघून गेले. कोल्हा मात्र आपल्या घरीं न जातां राणीसाहेबांच्या भेटीस निघाला. त्याच्या डोक्यांत विचारचक्र चालू होते. दुःखांत मग्न झालेल्या राणीसाहेबानीं हुंदक्यानीच त्याचें स्वागत केलें. त्यानेंहि मान तुकवून राणीसाहेबांना सलाम केला. आणि कांहीं सांत्वन-पर शब्द उच्चारून त्यांचें दुःख हलकें केलें.

थोडा वेळ जिकडे तिकडे भयाण स्तब्धता पसरली,

' राणीसाहेब, महाराजांचा घात कोणी केला हें मला माहित आहे. ' स्तब्धतेचा भंग करून कोल्हा म्हणाला.

' म्हणजे ? काय मूर्खासारखा बडबडतोस तूं ? ' कसाबसा आवंढा गिळून राणीसाहेब म्हणाल्या.

‘ क्षमा करा ! खरी गोष्ट सांगणं माझं कर्तव्य आहे. राजकुलाशीं मला एकनिष्ठ राहिलं पाहिजे. मग आपण माझ्या गोष्टीवर विश्वास ठेवा अगर ठेवूं नका—’

‘ सांग, माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. ’ राणी-साहेब कातर आवाजांत पण कांहींशा उत्सुकतेनं म्हणाल्या.

‘ परवाच्या दिवशीं लांडग्यानें महाराजांना मेजवानी आणली होती, हें तुम्हाला माहित आहेच. राणीसाहेब, तींत त्यानं विष मिसळलं होतं. म्हणूनच महाराजांना मरण आलं ! ही गोष्ट मला एका म्हाताऱ्या माकडानं सांगितली–आजचीच गोष्ट घ्या ! तुम्ही इथं दुःख करीत आहांत, पण तिकडं तो खुशाल राजा म्हणून मिरवत आहे ! उद्यां सकाळीं तो जातीनं तुम्हाला भेटायला येणार आहे ! आणखी त्याचे काय काय डाव आहेत, कुणास ठाऊक ! ’

कोल्ह्याचं हें बोलणं ऐकून राणीसाहेब अतोनात संतापल्या. दुःख आणि संताप यानं त्या उद्विग्न झाल्या. लांडग्याला फार कडक शिक्षा करण्याचं त्यानीं योजलं. कोल्ह्यानं त्यांचा निरोप घेतला.

---

चं द्र कां त शे ळ्के

सकाळची वेळ. दिनकराचीं सोनेरीं किरणें वसुधेला नटवीत होतीं. वारा मंदगतीनं चालला होता. वाटेंत झाडा-झुडपाशीं तो हितगुज करी. पक्षीगणांचा किलबिलाट चालू होता. अशा प्रसन्न समयीं लांडगा सर्व पशूसमवेत गुहेकडे निघाला गुहेपाशीं येतांच सर्वांना बाहेर उभें करून मोठ्या डौलानें त्यानें गुहेंत प्रवेश केला. तोंच रागानें धुंद झालेल्या राणीसाहेबांनीं एक झडप घालून त्याला ठार केलें.

—आणि त्याच वेळीं कोल्ह्यानें सूडाच्या समाधानानें आसुरी हास्य केलें !

ऑगस्ट ५० —नवभारत

# जशास तसें !

किल्बिल् किल्बिल् !...

पहांट झाली. निसर्गाची जिवंत घड्याळें किण्किण्ली. अेका सुरांत. अेका रवात नि अेका आवाजांत !

त्या मधुर किलबिलाटानें रामवनांतील आम्रवृक्षावरील सारें पक्षीगण जागें झाले. आणि मग सारे वातावरण किल-बिलाटानें निनादलें.

आम्र-वृक्ष ! साऱ्या वृक्षांत भरीव देहाचा ! हिरव्या गार पर्णांचा ! आणि शीतल छायेचा दाता म्हणून प्रसिद्ध होता. त्याच्या विशाल फांद्या चहूंकडे पसरल्या होत्या. त्या-वर बहरलेल्या मधुर फुलांच्या वेली पसरलेल्या होत्या. त्यावर सुन्दर सुन्दर फुलें फुललीं होतीं. लहान, मोठीं आकर्षक, रंगीत नि सुगंधित, मकरन्द युक्त ! त्यांचा सुवास आजूबाजूस दरवळत होता. अवखळ वाऱ्याच्या संगतींत. त्यामुळें आम्रवृक्षावर नाना जातीचे, चित्र विचित्र पक्षी आप-आपली घरटीं थाटून रहात होते. अगदीं सुखाने मजेनें आनंदानें नि खेळीमेळीनें !

---

दि न क र दे श पां डे

त्यांतीलच एक जोडपें रानपांखराचें होतें. आपल्या परीनें तें अत्यंत सुखी होतें. परोपकार हा त्यांचा आवडता उद्योग होता. मित्रत्व हें त्यांचं ब्रीद होतं. शालीनता ही त्यांची संपत्ति होती. दिवसभर भक्षाच्या शोधार्थ रानोमाळ भटकावें आणि उरलेल्या वेळांत 'प्राणिसेवा' करावी असा त्यांचा नित्यक्रम होता. त्यांतच त्यांचा आनंद होता. सुख होतं. समाधान होतं.

पावसाळ्याला तोंड फुटलं होतं. रानपांखराचें जोडपें पर्णाच्या छत्रीखालीं आपलें गुलाबी पंख पिसळून बसलें होतें. आपल्या चिमुकल्या संसारांतील सुखदुःखाच्या गोष्टी बोलत होतें तें.

रानपांखराचें जोडपें रहात होतें, त्याच फांदीखालीं पाण्याचें एक डबकें सांचलें होतें. त्यांत नरमादीचें प्रतिबिंब पडलें होतें. जणूं पाण्याच्या आरशांत तें आपली वेषभूषा न्याहाळीत होतें !

...... तोंच नराची दृष्टि झाडाखालीं गेली. त्या डबक्यांत एक वाळवी पडली होती. बाहेर निघावयासाठीं तिची धडपड चालू होती प्राण वाचविण्यासाठीं सारी तिची धडपड होती !

वाळवीची करुणावस्था पाहून नरास दया आली. त्याच्या अंगातील परोपकार जागा आला. लहानपणीं आईनें सांगितलेल्या परोपकारी पारव्याची गोष्ट त्याला आठवली. मग क्षणाचाहि विलंब न करतां तो झेंप घेऊन खालीं आला. अन् वाळल्या पानाची अेक होडी डबक्यांत सोडून त्यानें वाळवीस काठांवर आणून सोडलें व तो आपल्या घरट्यास परत आला. परोपकाराचें निर्मळ समाधान त्याच्या मुखावर विलसत होतें.

* * *

वाऱ्याच्या झुळकीप्रमाणें दिवस जात होते. वृद्धत्वाच्या आघातानें आतां तो आम्रवृक्ष वाळावयास लागला असं साऱ्या पक्ष्यांस वाटत होतं.

कितीतरी पक्ष्यांच्या घरट्यांत निळीं, पांढरी अंडीं दिसत होतीं. कांहींच्या घरट्यांतून चिमण्या गोळ्यांचा चिवचिवाट निघत होता. रानपांखराच्याहि घरट्यांत दोन पांढरी अंडीं दिसत होतीं. नर आणि मादी त्यांस आळीपाळीनें ऊब देत असत. रिकामपण असलं कीं दोघंहि त्या अंड्यांच्या आंत दडलेल्या आपल्या छकुल्यांचं रूप कल्पित असत. त्यांत त्यानां मौज वाटायची. हर्ष व्हावयाचा सुख मिळायचं. आनंद लाभायचा !

# ल ल का र

ऋतूंचे रहाट गाडगे फिरत होतें. हिवाळा गेला, उन्हाळा पळाला आणि पुन्हा पावसाळा आला...... !

एके दिवशीं आकाशांत खूप काळे कभिन्न मेघ गोळा झालें. त्यांतील कांहीं आपल्या भसाड्या आवाजांत वसुंधरेस अंगाईगीत गाऊं लागले. बेताल, बदसूर कर्कशपणें ! कान-ठळ्या बसेपर्यंत. घसा खरडून ओरडत होते तें.

त्या आवाजानें सारें पक्षी भयभीत झाले. भीतीनें ओरडूं लागले. अेरवीं कानास गोड वाटणारा किलबिलाट करणारे हेंच पक्षी आहेत हें कुणासहि खरं वाटलं नसतं इतकी त्या आवाजांत कर्कशता होती. चिमणी पांखरं भीतीनें हवा-लदील झाली होती. कांहीं तर आपल्या आईच्या पदररूपी पंखाखालीं लपलीं, दडलीं.

गड् ऽ गड् ऽ ऽ गड् ऽ ऽ !! सारीकडे अेकच आवाज घुमत होता, खूप जोरानें ! अशात अवखळ वाराहि जोरानें धावूं लागला. टारगट पोरांसोराप्रमाणें ओरडूं लागला...सों ऽ ऽ सों ऽ ऽ ऽ !

बिचारा आम्रवृक्ष वाऱ्याच्या ह्या चढाईस मोठ्या हिम्मतीनें तोंड देत होता. त्याची शक्ति क्षणाक्षणाला कमी कमी होत होती. पण...! ईर्षेनें तों त्या ठिकाणीं टक्कर देत उभा होता, खंबीरपणें ! हिमालयाच्या हिम्मतीनें !

दि न क र दे श पां डे

पण...! जीर्ण शरीर किती दिवस तगणार नि टिकणार ? त्याचंहि तसंच झालं. आणि शेवटीं वाऱ्याच्या एका जोरदार धक्यानं तो आम्रवृक्ष...!!

कड ऽ कड ऽ कड्ड् ऽ असा आवाज करून धाडदिशीं जमिनीवर कोसळला...त्याचें अस्तित्व नष्ट झालें होतें !

सारें पक्षी भीतीनें आकाशांत उडाले. फांदीखालीं सांपडलेले कांहीं पक्षी जिवासाठीं ओरडूं लागले. पंखाची फडफड ! प्राण वांचविण्याची धडपड ! नि करुण चीत्कार ह्यानें सारें वातावरण भरून गेलें !

क्षणापूर्वीं धडपड करणारे जिवंत मांसाचे गोळे चेतनाहीन झाले होते. आईच्या पदरापासून दूर फेकले गेले होते. मातींतून आलेले मातींत मिसळत होते. कष्टानें बांधलेली घरटीं मोडलीं होतीं. त्यांतील कापसाच्या मऊ गाद्या वाऱ्याच्या हिंदोळ्यावर पडून दूर दूर जात होत्या ! साऱ्यांचा संसार विस्कळित झाला होता. अपक्व अंडीं घरंगळत जाऊन दूर पडलीं होतीं. त्यांतील कांहीं टिचलीं नि फुटलीं.

रानपांखराचें जोडपें आकाशांत भराऱ्या मारीत होतें. आपल्या विस्कटलेल्या घरट्याचे तुटलेले अवशेष ते शोधीत होतें...तोंच नरपक्षाची नजर सहज त्या झाडाच्या बुंध्याकडे गेली—

दिनकर देशपांडे

...आणि त्याची त्याला चीड आली, साऱ्यांच्या नाशास जणू आपणच कारणीभूत आहोत, असं त्याला वाटूं लागलं. त्याचा परोपकार त्यास भोंवला होता. त्यांच्या परोपकारानें त्याचा, व त्याच्याबरोबर इतरांचा नाश केला होता.

'परोपकार देखील नाश करतो!' पक्षी उद्वेगानं पुटपुटला. अन् त्याच्या डोळ्यापुढें कांहीं दिवसापूर्वीं अेका वाळवीवर केलेल्या उपकाराचें दृश्य उभें राहिलें.

पण आज त्याच वाळवीनें त्यांचा नाश केला होता. कारण असंख्य वाळव्या त्या झाडाच्या बुंध्यातून बाहेर पडतांना तो पहात होता. अेका वाळवीला त्यानें जीवदान दिलं होतं व बुंध्यापाशीं नेऊन सोडलं होतं...आणि कालांतराने तिचा संसार वाढून ...त्यांनीं त्या खंबीर वृक्षास...खिळ-खिळा केला होता. त्यावर लागलेले फुलाफळांचे अलंकार त्यांनीं लुटले होते. आणि शेवटीं त्यास ताकद्हीन करून त्याचा नाश केला होता. 'उपकाराची फेड केली पाहिजे!' पक्षी पुन्हा पुटपुटला.

त्यानें अेक जोरकस चीत्कार केला. आकाशांत उडणारे सारे पक्षी त्याच्या आसपास आले. आणि तो पक्षांचा विशाल थवा झाडाच्या बुंध्याकडे झेपावला, अन् ते

पक्षी आपल्या बांकदार चोचीनें पटापट त्या वाळव्या टिपूं लागले.

वारा थांबला होता. ढग पांगले होते. सूर्य थोडा वर आला होता. फुटलेलीं अंडीं, मेलेलीं पिलं, मोडलेलीं घरटीं सारं सारं विस्कळित झालं होतं !

आणि रात्रीची भुकेलीं पांखरें त्या वाळव्या टिपण्यांत चूर झालीं होतीं. क्षणापूर्वी कांहींच घडलं नाहीं असाच सर्वांचा आविर्भाव होता, वागणूक होती.

उपकाराची फेड होत होती ! उत्कृष्ट फेड ! जशास तसें !

२२-७-५२

दिनकर देशपांडे

# लंबकर्ण

ब्रह्मदेवांनीं आपण तयार केलेल्या प्राण्याकडे मोठ्या प्रेमळ दृष्टीनें पाहिलें. त्याच्यांत कांहीं उणीव नसल्याचीं खात्री होतांच त्यानीं प्रत्येकांची भूतलावर पाठवण सुरू केली त्यांनीं सर्वांना पृथ्वीवर पाठविलें. इतक्यांत घोडा त्यांच्या दृष्टीस पडला. ‘ तूं अजून पृथ्वीवर कां नाहीं गेलास ?’ ब्रह्म-देवानें त्याला विचारलें.

आपणांस लहान भाऊ मिळेपर्यंत आपण येथून हल-णार नाहीं असें घोड्यानें ब्रम्हदेवास अगदीं स्पष्ट सांगितलें व त्याचा हट्ट पुरविण्याच्या दृष्टीनें ब्रम्हदेवानें घोड्यासाठी लहान भाऊ बनविण्याचें कार्य हातीं घेतलें. थोड्या अव-धींत घोड्यासाठीं लहान भाऊ तयार देखील झाला. त्याचें सर्व अंग ओलें होतें. आपण घरांतून कुंचला आणू तोपर्यंत याचें शरीर वाळेल असा विचार करून ब्रम्हदेव कुंचला व रंग आणण्यासाठीं घरांत निघून गेले.

ब्रह्मदेव निघून जातांच ह्या घोड्याच्या भावाने दंगा-मस्ती करण्यास सुरवात केली. तो वाटेल तशा उड्या मारूं लागला व जवळच पडलेल्या राखेंत लोळण्यास देखील त्यानें

दिनकर देशपांडे

कमी केलें नाहीं. राखेत लोळल्यानें त्याचें सर्व अंग पांढरें भुरकट झालें.

इतक्यांत ब्रह्मदेव त्या ठिकाणीं आले. व घोड्याच्या भावाचा खोडकर स्वभाव पाहून त्यांना त्याचा राग आला. 'तूं असाच जन्मभर लाथा झाडीत रहा' असें म्हणून त्यांनीं त्याचे दोन्ही कान धरून ओढले. चेहऱ्याचा भाग ओला असल्यानें त्याचे कान पूर्वीपेक्षां लांब झाले! ब्रम्हदेवाच्या हें लक्षांत आलें. पण असल्या गडबड्या प्राण्याला अिथे ठेवणें त्यांना सुरक्षितपणाचे वाटलें नाहीं व लवकरच त्यांनी त्याची भूतलावर रवानगी केली.

पृथ्वीवर ह्या लांब कानाच्या प्राण्याला पाहून लोकांनीं त्याला 'लंबकर्ण' हें नांव बहाल केलें!

१५-३-५०

—बालसान्मित्र

वा. क्र. 60५२
[illegible]

## मुलांचे मासिक :

मुलांना उपयुक्त गोष्टी, सुंदर कविता, माहितीपूर्ण लेख, दादांचा सल्ला व समाचार पत्रिका यांचे श्री. बा. रा. मोडक यांनी केलेले कुशल संपादन. वा. व. ३ रु. नवी शुक्रवारी, नागपूर.

## बालसेवा :

सर्वांग सुंदर, सुबोध आणि सचित्र वा. व. ट. ह. सह अडीच रुपये संपादक : ना. मा. तळारवार, अचलेश्वर, चांदा ( म. प्र. )

## बालसन्मित्र :

शेंकडों छोट्या लेखांनीं भरगच्च भरलेलें व मराठी साहित्यांत अजरामर झालेलें पाक्षिक. संपादक : पा. ना. मिसाळ

वा. व. ३ रु. पत्ता. मालवण ( जि. रत्नागिरी )

---

कुमार साहित्याची सेवा करणारी व कुमार
साहित्यिकांनीं चालविलेली महाराष्ट्रांतील

**★ एकमेव प्रकाशन संस्था ★**

१५ ऑगस्टच्या शुभ दिनापासून संस्थेच्या विद्यमानें " कुमार साहित्य माला " आम्हीं सुरू केली आहे. मालेची सभासद वर्गणी प्रतिवर्षी फक्त १ रु. १२ आणे आहे. माहितीसाठीं आजच लिहा —

---

**कुमार साहित्य प्रकाशन, ७२८ रविवार, कोल्हापूर.**

## ‘ पूजा ’ पात्रांतील सुशोभित भेटी –

★ आनंदी आनंद गडे ! (अभिनव कथासंग्रह) दिनकर देशपांडे

★ प्रकाशाकडे ( काव्य ) –ल. वा. पडोळे

★ बिचारे निर्दोषी पोर ( कादंबरी ) ले. शंकर कऱ्हाडे

★ साने गुरुजींची हांक ( नाटिका ) ले. प्रभाकर बेंद्रे

★ संगीत पैशाचा खेळ ( नाटिका ) ले. श्री. ना. पेठे

आगामी-

★ पुंड्याची पुंडाई ( कथा ) चंद्रकांत शेट्ये

## पूजा प्रकाशन, धनतोली, नागपूर.

● **चतुर चंपा** किं. ६ आणे

लहानथोर वाचकांनीं वाखाणलेला, वृत्तपत्रांनीं गौरविलेला सहा सुंदर सचित्र गोष्टींचा संग्रह.

● **मधु मुरली** किं. ८ आणे

लोकसाहित्यातील लाखमोलाच्या कथांपैकीं एक सर्वांग सुंदर कथा, श्री. गोपीनाथ तळवलकरांच्या प्रस्तावनेसह–

● **मधुर मेवा** किं. ५ आणे

बालगोपालांच्या नित्य ओठीं खेळतील अशा सोप्या, सुटसुटींत पण सरस गीतांचा संग्रह. उत्कृष्ट सजावट, अनेक चित्रें व बहुरंगी छपाई.

## श्री शंकर सारडा प्रकाशन, पुणें २

प्रकाशन सृष्टींतील तेजस्वी तारा—

★ **श्री. ग. पां. परचुरे, मुंबई**—

यांना अर्पण करण्यांत आलेला

एक अभिनव नाट्यछटा संग्रह

# एकेक कळी

लेखकः **चंद्रकांत शेट्ये**

★ लवकरच भेटीस येत आहे !



ग्रंथ संग्रहालय



**कु. सा. माला, दुसरें पुष्प.**

# राणीपरीची कृपा

**लेखक— शंकर रा. सारडा,**

प्रसिद्ध कुमार लेखक शंकर सारडा यांनी लिहिलेली सुंदर गोष्ट, आकर्षक चित्रांनी नटूनथटून, सुंदर मुखपृष्ठ पेहरून दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर थाटामाटांत प्रसिद्ध होणार. प्रति मर्यादित आहेत, निराशा टाळण्यासाठीं आतांच आपली प्रत नोंदवून ठेवा. **किंमत फक्त पांच आणे.**